मराठवाडा विभागासाठी १००% राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी वित्तीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुसिंयो-२११७/प्र.क्र.२०८/१७/४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२
तारीख: ७ ऑक्टोबर, २०१७

वाचा

1. **शासन निर्णय क्रमांक सुसिंयो-२११५/प्र.क्र.३८२/४अे, दि. १४ ऑक्टोबर, २०१६.**
2. **वित्त विभागाचे परिपत्रक क्र. - अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७**
3. **वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९७/ अर्थ-३, दि.३० जून, २०१७**
4. **शासन निर्णय क्रमांक सुसिंयो-२११७/प्र.क्र.१०७/१७/४अे, दि. ७ ऑगस्ट, २०१७.**

प्रस्तावना

मराठवाडा विभागात सतत पडणाऱ्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्यामध्ये जास्तीत जास्त क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्याच्या उद्देशाने, संदर्भाधीन अ.क्र. १ येथील दि. १४ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये, मराठवाडा विभागासाठी १००% राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना सन २०१६-१७ ते २०१८-१९ या ३ वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार ३ वर्षाच्या कालावधीत सुमारे ३३७ कोटी एवढया रकमेचा कार्यक्रम राबवावयाचा आहे. सदर योजनेची सन २०१७-१८ या वर्षात अंमलबजावणी करण्यासाठी, रु.१४३.५० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. वित्त विभागाने संदर्भाधीन अ.क्र.३ येथील दि. ३० जून, २०१७ च्या परिपत्रकान्वये वित्तीय वर्ष २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय तरतुदीपैकी महसूली लेख्यातील निधी ७०% च्या मर्यादेत दुय्यम कार्यालयाना वितरीत करण्यास अनुमती दिलेली आहे. त्यानुसार रु.१४३.५० कोटी पैकी रु.१००.४५ कोटी एवढा निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

१. मराठवाडा विभागासाठी १००% राज्य पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना सन २०१७-१८ या वर्षात राबविण्यासाठी रु.१००.४५ कोटी (अक्षरी: रुपये शंभर कोटी पंचेचाळीस लक्ष फक्त) एवढ्या रकमेच्या कार्यक्रमास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सदर खर्च सन २०१७-१८ या वर्षातील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

मागणी क्र.डी-३
२४०१, पीक संवर्धन
(००) ११९, बागायाती व भाजीपाला पिके
(०३) रोपमळे
(०३) (३५) १००%राज्य पुरस्कृत सूक्ष्म सिचंन योजना (केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिचंन अभियानासी समांतर)
(२४०१ ९४४७)
३३ - अर्थसहाय्य

३. सदर निधीचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत.

४. सदर निधी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सन २०१७-१८ या वर्षात प्राप्त अर्जांसाठी, निधीच्या मर्यादेत पूर्वसंमती देऊन वापरण्यात यावा.

५. सदर निधीतून मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना २ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत अनुदान देण्यात यावे.

६. योजनेची अंमलबजावणी करताना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकाच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच संदर्भाधीन अ.क्र.४ येथील शासन निर्णयातील अटी/शर्ती व कार्यपद्धतीमध्ये पालन करण्यात यावे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परीपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ मधील अटींची पूर्तता करुन व वित्त विभागाचे परिपत्रक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००७१७०८५८६९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.10.07 16:57:39 +05'30'

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त (कृषी),कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
२) मा.मंत्री (कृषी व पणन) यांचे खाजगी सचिव
३) मा.राज्यमंत्री (कृषी व पणन) यांचे खाजगी सचिव
४) प्रधान सचिव (कृषी) यांचे स्विय सहायक

५) सर्व संचालक, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
६) विभाग प्रमुख, एकात्मिक जल व्यवस्थापन, महात्मा फुले कृषी विद्यापिठ, राहुरी
७) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, महात्मा फुले कृषी विद्यापिठ, राहुरी
८) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठ, परभणी
९) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठ, दापोली
१०) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठ, अकोला
११) विभागीय कृषी सहसंचालक (औरंगाबाद व लातुर)
१२) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी व हिंगोली)
१३) मंडळ कृषी अधिकारी/तालुका कृषी अधिकारी (मराठवाडा विभागातील)
१४) जिल्हा कोषागार अधिकारी (औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी व हिंगोली)
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण) महाराष्ट्र -१/२ मुंबई/नागपुर
१६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१७) संचालक, लेखा व कोषागार, मुंबई
१८) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, वाशी.
१९) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपुर
२०) उप संचालक, लेखा व कोषागारे कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपुर
२१) सर्व कार्यासने व पर्यवेक्षिय अधिकारी (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
२२) निवडनस्ती.